# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/09/2023 (बुधवार) दुपार

---

### दरोडा

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील फिर्यादीचे रहाते घराजवळून जवाहर नगर कन्हान येथे दिनांक १४/०७/२०२३ चे १५.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रोहीत सिद्धार्थ मानवटकर, वय ३० वर्ष रा. प्रभाग क्र. ४ जवाहर नगर कन्हान जि. नागपूर हा घर बांधकामाचे मजुरीचे काम करतो. कामाने लांब जावे लागत असल्याने फिर्यादी यांनी सन २०१६ मध्ये ॲक्टीवा 3G दुचाकी मोपेड गाडी रजि. नंबर MH40 BA- 8731 ताजश्री होन्डा नागपूर यांनी श्रीराम फायनांस कंपनी कडून कर्ज मिळवून दिले. सदरहु फायनान्स कंपनीच्या मासीक किस्तीमध्ये दोन वर्षात परत फेडीच्या शर्ती व अटीवर मिळवून दिले होते. सदर २३८१/— रू. फिर्यादीचे महिन्याचे पंजाब नॅशनल बॅंक कन्हान येथे सदर मासीक किस्त २३८१/— रू. ही प्रत्येक महिन्याचे १ ते १० तारीख पर्यंत कपायची फिर्यादीचे गाडीची किस्त ही नियमितपणे कपायची फिर्यादी हा दि. १४/०७/२०२३ रोजी दुपारी ०३/३० वा. ते ०४/०० वा. आपले काम करून नागपूर वरून बसने परत येत असतांना फिर्यादीचे वस्तीतील विक्की उके याचा फिर्यादीला फोन आला की, ५ ते ६ लोक तुझे नाव विचारत होते त्यांच्या वागण्यावरून ते अपराधीक गुन्हेगार असल्याचा संशय आला असल्याने त्याचा पाठलाग केला ते तुझ्या काळया रंगाची ॲक्टीवा गाडीचे हॅन्डलॉक तोडून पसार होतांना बघीतले ते कामठी मार्गाने पळाले आहे असा फोन ठेवताच बसने कन्हान कामठी पुलावर दुसऱ्या दुचाकीने ऑटो करून घेवून जातांना दिसून आले तसेच फिर्यादी त्वरीत कन्हान नगर परिषद बस स्टॉपवर उतरून ऑटोने पाठलाग केला असता मिळून आले नाही फिर्यादी याला कोणतीही पुर्व सुचना न देता **१) शाखा प्रबंधक, श्री राम फायनान्स नागपूर २) सिजर मॅनेजर श्री. राम फायनान्स नागपूर ३) तिन अज्ञात आरोपी व अन्य लिप्त आरोपी** यांनी फिर्यादी याला नोटीस न देता लुटून नेली फिर्यादीचे गाडी मध्ये १००००/—रू. आणि स्टॅम्प पेपर तसेच महत्वपुर्ण दस्तऐवज होते तसेच गाडी नेल्याबाबतचे फुटेज महामार्ग ४४ च्या सी सी टी व्ही मध्ये रेकॉर्ड झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ३८९, ३९१, ३९५, १२०—B, ५०६, २९४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार खुशाल रामटेके मो. क्र. ८४८५८६१४४२ हे करीत आहे.

## जबरी चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा हातोडी शिवार येथे दिनांक २०/०९/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— किसमीबाई नारायण मोहारे, वय ७० वर्ष, रा. हातोडी ता. रामटेक ही कॅम्प ट्रामा सेंटर मेडीकल नागपुर ही शेत मजुरी करते तिचे पती मरण पावले असुन तिला एक मुलगी आहे तिचे नाव —संगीता कवडु ठकरेले, वय ४३ वर्षे, रा. हातोडी ता. रामटेक जि. नागपुर आहे. फिर्यादीची बहिण नामे— श्यामकला ताराचंद लिल्हारे रा. सिर्सोली आंधडगांव ता. मोहाडी जि. भंडारा तिला दोन मुली एक मुलगा आहे. मुलगा नामे— महेश ताराचंद लिल्हारे वय अंदाजे ३५ वर्षे हा फिर्यादी कडे नेहमी येत जात होता. त्याचेकडे थोडीफार शेती आहे. तो फिर्यादीकडे आला की काही खाऊ आणत होता फिर्यादी त्याने आणलेला खाऊ खात होती. फिर्यादीचे बहिणीचा मुलगा असल्याने फिर्यादीचे त्याचे मुला व आई सारखे प्रेम होते. फिर्यादी जेव्हा केव्हा त्याला काही कामा करिता बोलावले की तो फिर्यादीकडे येत होता व फिर्यादीला मदत करित होता. दि. २०.०९.२०२३ रोजी सकाळी फिर्यादी नेहमी प्रमाणे गायी करिता गवत आणण्याकरिता शेतात गेली होती. फिर्यादी गवत कापत असतांना सकाळी १०.०० वा. सुमारास हातोडी शेतात फिर्यादीचा बहिण लेक **आरोपी नामे —महेश ताराचंद लिल्हारे, वय ३५ वर्षे, रा. सिसोर्ली आंधळगांव ता. मोहार्डी जि. भंडारा** आला. फिर्यादी सोबत बोलत तिला खायला केळी दिली. दोघांनी केळी खाल्ली नंतर फिर्यादीचा टोगळा दुखत होता तेव्हा फिर्यादीला गोळी खायला दिली काही वेळा नंतर फिर्यादीला काही आठवत नव्हते. फिर्यादीला कोणी दवाखान्यात आणले तिला माहीत नाही. फिर्यादीची प्रकृती बरी झाल्याने तिने आपले कानाला हात लावुन पाहीले तर कान दुखत असुन व कानाताली कर्णफुल सोन्याच्या बिऱ्या लहान मोठ्या लहान ६ नग व मोठे २ नग २५ वर्षा अगोदर घेतलेले होते तेव्हा त्याची किंमत ४,०००/— रू (अक्षरी चार हजार रू. होते) (दागीने १ तोळा होते) ते दिसले नाही. तेव्हा फिर्यादीने तिच्या मुलीला व नातुला कानातल्या भांड्याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले तु शेतात पडली होती. कानातुन रक्त निघत होते कानातले सोन्याचे भांडे नव्हते तब्येत जास्त खराब होती म्हणुन दवाखान्यात उपचाराकरिता आणले फिर्यादी सध्या दवाखान्यात भर्ती आहे. फिर्यादीचा बहिण लेक महेश लिल्हारे याने फिर्यादीचा घात करून फिर्यादीचे सोन्याचे भांडे चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३९४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय खोब्रागडे मो. नं. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. खापा** :— दिनांक ०२/०३/२०२३ चे दुपारी ०२.३० वा. ते दिनांक २६/०९/२०२३ चे सकाळी ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व **आरोपी नामे—१) धीरज हिवरकर वय २१ वर्षे, २) लकी धार्मीक वय २० वर्ष, ३) विकास हेडाउ, वय २३ वर्ष, ४) वेदु आवते, वय २३ वर्ष, ५) गोलु लिखार, वय २५ वर्ष, ६) लिलाधर चौरागडे, ७) सुशिल धार्मिक, ८) गौरव खुबाळकर, ९) प्रणय टेकाडे, १०) निखील धांदे, ११) विक्की लिखार, १२) स्नेहल सुरकार वरील सर्व रा. खापा ता. सावनेर** हे एकाच गावात राहत असुन फिर्यादी हीचे पिडीत मुलगी वय १५ वर्ष हिचा यातील आरोपींनी वारंवार पाठलाग करून तिचे वडीलास मारण्याची धमकी देवुन तिचे अश्लिल फोटो आरोपी क्र. ०१ ने मोबाईलवर मागवुन ते फोटो त्याचे मित्र ईतर आरोपी त्याचे मोबाईलवर पाठवुन पिडीतेस ते फोटो दाखवुन तिला भेटण्यास बोलावुन तिचे अश्लिल फोटो वायरल करून तिचे मनास लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले. सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान पिडीत मुलगी हिने पोलीस स्टेशनला येवुन पुरवणी बयाण दिले की धीरज हिवरकर याने त्याचे मोबाईलमध्ये तिचे अश्लील फोटो घेतले त्यानंतर गोलु लिखार हा फिर्यादीजवळ आला आणि तिला पकडुन त्याचे घराचे आतील खोलीत घेवुन गेला. त्याचे सोबत धीरज हिवरकर, वेदु आवते, लिलाधर चौरागडे हे आले गोलु लिखार याने पिडीते सोबत जबरदस्तीने शारिरीक संबंध केले. तसेच गोलु लिखार याने पिडीतेस फोटो वायरल

करण्याची धमकी देवुन आपले घरी बोलावुन गोलु लिखारचे घरी दुसऱ्या खोलीत निखील धांदे, गौरव खुबाळकर, सुशिल धार्मिक, गोलु लिखार याने एका पाठोपाठ पिडीते सोबत जबरदस्तीने शारिरीक संबंध केले. तसेच लकी धार्मिक, विकास हेडाउ, विक्की लिखार, स्नेहल सुरकार, प्रणय टेकाडे सर्व राहणार खापा यांनी पिडीतेस त्यांचे मोबाईलमध्ये पिडीतेचे फोटो आहे आणि ते फोटो वायरल करण्याची धमकी देवुन वारंवार त्रास दिला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७६ (२) (एन), ३७६(ड), (डअ), ३५४(अ), ३५४(ड), ५०६ भादंवी सहकलम ४, ६, ११, १२ बालकांचे लैंगिक अपराधपासुन संरक्षण अधिनियम २०१२ सहकलम ६७, ६७(अ) माहीती तंत्रज्ञान अधिनीयम २००० कलमवाढ करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री रविंन्द्र मानकर मो. नं. ७०२०७०५४१७ हे करीत आहे.

**पोलीस माहिति कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**